Rotary UNITE FOR GOOD

# Sunshine

## Monthly Bulletin of

# Rotary Club of Sangli

## RI Dist. 3170

## 2025-26

Club President : Rtn. Mahesh Jhanwar
Club Secretary : Rtn. Dr. Abhijit Udgaonkar

Rotary International President : Rtn. Francesco Arezzo
District Governor : Rtn. Er. Arun Bhandare

Rotary District 3170 LET'S CREATE A LEGACY 2025-26

Editor : Rtn. Dr. Suhas Joshi
Editorial Board
Rtn. Dr. Chandrashekhar Purandare
Rtn. Bipin Shevade

## August 2025

Draft

## From the Editor's Desk



### *Rtn. Dr. Suhas Joshi*

## A Harmonious Club:

**The Dos and Don'ts**

Dear Fellow Rotarians,As we prepare for another fantastic month of service and fellowship, I would like to take a moment to reflect on what makes our club, the Rotary Club of Sangli, so special. We're a large and vibrant club in RID3170, and with that size comes a great opportunity for diverse ideas and impactful projects. It also means we have a unique responsibility to ensure we maintain a strong, unified, and harmonious environment.With that in mind, I want to share a few "dos and don'ts" for keeping our club a place of mutual respect and collaboration.

**The Dos:**

1.Do listen actively. Every Rotarian has a valuable perspective. Take the time to truly hear what others are saying, whether in a meeting or a casual conversation. This not only shows respect but can also lead to better decisions and more innovative solutions for our projects.

2.Do volunteer with an open heart. When you sign up for a project, do so with the intention of working together and supporting your fellow Rotarians. Embrace your role, big or small, and focus on the collective goal.

3.Do communicate constructively. If you have a concern or a differing opinion, approach it with a solution-oriented mindset. A private, respectful conversation is often more effective than a public complaint.

4.Do celebrate our wins, big and small. Take a moment to acknowledge the hard work of your fellow members. A simple "thank you" or "great job" can go a long way in building a positive and supportive atmosphere.

**The Don’ts:**

1.Don't form cliques. Our club is a family, and just like any family, it thrives on inclusivity. Avoid creating small, exclusive groups that can unintentionally alienate others. Let's make an effort to connect with members we don't know well.

2.Don't assume the worst. Before jumping to conclusions about a fellow Rotarian's actions or intentions, consider giving them the benefit of the doubt. Misunderstandings can be easily resolved with a quick and friendly chat.

3.Don't let disagreements linger. If a disagreement arises, address it promptly and respectfully. Holding on to grudges only creates tension and erodes the trust that is so crucial to our club's success.

4.Don't forget our purpose.  Ultimately, we are here to serve. Our projects and fellowship are a testament to our shared commitment to "Service Above Self." Let's keep this core value at the forefront of every interaction.

Our club's strength lies in our unity. By keeping these simple principles in mind, we can continue to be a powerful force for good in Sangli and beyond.




Aaugust is dedicated to Membership and New Club Development Month.

This is a key time to reflect on the vitality of Rotary, welcome new members and strengthen diversity.

Recruitment is not just about numbers: it is also about finding motivated people, ready to act for the common good.

## President's Message



*Rtn. Mahesh Jhanwar*

Dear Fellow Rotarians,

Greetings to each one of you!

As we move into this new month, I feel immense pride in the energy and enthusiasm our club continues to display. Each activity we have undertaken reflects the true spirit of Rotary—Service Above Self. From impactful community service projects to fellowship gatherings, every effort strengthens our bond as a club and leaves a positive mark on society.

I extend my heartfelt thanks to all members for your dedication, time, and contributions. It is through your collective efforts that we are able to dream bigger and serve better.

In the coming weeks, let us continue to embrace opportunities for service, friendship, and growth. Together, we can make this year memorable and meaningful—not just for us, but for the lives we touch.

Let's keep the Rotary wheel turning with passion and purpose!

## Secretarial Report



## Rtn. Dr. Abhijit Udgaonkar

### Meeting No. 6 Date: Thursday, 7th August 2025

### Musical Tambola

A special musical programme was organized on the occasion of Friendship Day.

The evening featured Live Musical Tambola with the talented Mr. Rohit Sutar, which was thoroughly enjoyed by all present. Songs were sung along with Tambola slips , and so it was a great combination of entertainment plus competition! Members participated actively in the musical tambola, creating an atmosphere of joy and fellowship. 5 housie prizes were announced to be given in the next meeting! It was a great family program which was very nicely enjoyed by everyone! All members followed the White and Blue theme, adding to the vibrancy of the evening The meeting recorded excellent participation of 77 members-  with enthusiastic involvement from members and families.



## Meeting No. 7 Date: 14 August 2025

## New Member Induction Ceremony: At the auspicious hands of DG Arun Bhandare

The induction ceremony of new members of the Rotary Club of Sangli, along with the felicitation of their sponsors, was held at the auspicious hands of Chief Guest District Governor Rtn. Er. Arun Bhandare. A total of 19 members were inducted during this ceremonial function. With the 5 new members inducted in July 2025, our club has welcomed 24 new members this Rotray year till date — the highest number of inductions across Rotary District 3170. For this remarkable achievement, our club will be felicitated at the District Membership Seminar to be held on 7 September 2025 at Dharwad. With this addition, our membership has now grown to 173 Rotarians, positioning the Rotary Club of Sangli as a leader in membership strength in the entire district.

This grand induction ceremony was arranged aptly in observance of Rotary International's designated "Membership and New Club Development Month.

"District Governor Rtn. Arun Bhandare, in his address, lauded the Rotary Club of Sangli for its dynamic role and significant contributions, calling it a stalwart in the Rotary movement. He emphasized that Rotary is not only about service to society but also about personal growth—providing members with valuable networks, friendships, and connections that enrich both professional and personal lives. His inspiring words motivated members to cherish Rotary fellowship while continuing their dedicated service to the community.

The meeting also witnessed a touching moment when a disabled lady received a Jaipur Foot, donated through our club project, Usha-Mohini Vikalang Punarvasan Kendra, at the hands of the Chief Guest.

DG Bhandare further felicitated our Rotarians Rtn. Samir Gadgil, PP Rtn. Dr. C.S. Purandare, and Rtn. Abhay Bhagate with TRF lapel pins and certificates for their generous TRF contributions as well as Rtn. Dr. Ratan Patil and Rtn. Sudhatai Kulkarni for their dedicated community services. He also distributed prizes to the winners of the Musical Tambola competition.

On this occasion, our club proudly launched Rotary T-shirts as birthday gifts and identity cards for all members, at the hands of the District Governor.

Assistant Governor Rtn. Dhamendra Khilare also shared his thoughts. The program was conducted gracefully by Rtn. Bipin Shevde and Rtn. Dr. Abhijit Lendwe as MOCs. PP Rtn. Dr Suhas Joshi introduced the Chief Guest, while PP Rtn. Dr. Bhaskar Tamhankar proposed the Vote of Thanks.

The ceremony concluded with the soulful recitation of Pasaydan by Rtn. Adv. Pranand Joshi. The event was graced by several senior Rotarians and special invitees, making the evening memorable and inspiring.









ROTARY CLUB OF SANGLI


ROTARY CLUB OF SANGLI
Rtn. Francesco Arezzo
Rtn. Arun Bhandare
PRESIDENT
CHIEF GUEST


ROTARY CLUB
Rtn. Francesco Arezzo
Rtn. Arun Bhandare
Rtn. Dharmendra Khilare


ROTARY CLUB
Rtn. Francesco Arezzo
Rtn. Arun Bhandare
Rtn. Dharmendra Khilare
Rtn. Maheshkumar Jhanwar
Rtn. Dr. Abhijit Udgaonkar
UNITE FOR GOOD
CHIEF GUEST
PRESIDENT
SECRETARY


ROTARY CLUB
Rtn. Francesco Arezzo
Rtn. Arun Bhandare
Rtn. Dharmendra Khilare
Rtn. Maheshkumar Jhanwar
CHIEF GUEST
PRESIDENT
SECRETARY

## Meeting No.8, Date: 21 Aug 25

## Meeting at a Member’s Workplace. Chintamani Motors

## Host: Rtn Er Ujjwal Sathe

The Rotary Club of Sangli organized a special meeting under the unique concept of “Meeting at a Member’s Workplace” at Chintamani Motors, Sangli, the enterprise of Rtn. Er. Ujwal Sathe.

The purpose of this initiative was to strengthen fellowship among Rotarians, foster mutual understanding, and provide an opportunity to learn more about members’ professions and businesses. Such meetings give members valuable firsthand exposure to the innovative work being carried out by fellow Rotarians, offering both inspiration and knowledge sharing within the club.

Chintamani Motors, with its motto “Imagination to Engineering”, has built a strong reputation for transforming creative ideas into practical engineering solutions. The company specializes in customizing vehicles to serve diverse social and industrial needs — including school vans, cardiac ambulances, emergency service vehicles, multi-utility and off-road vehicles, security vehicles, waste collection vans, and blood donation vans. Over the years, thousands of vehicles have been successfully customized here, making Chintamani Motors a name synonymous with innovation, social impact, and community service.

Members were deeply impressed by the scale of operations and the spirit of innovation. In his address, Rtn. Er. Sathe emphasized that his company considers every employee as a joint owner of the enterprise, thereby fostering not only entrepreneurship and engineering excellence but also aligning with Rotary’s philosophy of “Service to Humanity.”

The meeting also marked the unveiling of the Club’s monthly news bulletin Sunshine (July 2025). The fellowship high tea was graciously sponsored by Rtn. Er. Ujwal Sathe, and the gathering witnessed enthusiastic participation from 81 members.


CHINTAMANI
Rotary


CHINTAMANI
Rotary


CHINTAMANI







## Meeting No 9 : 28 August 25

## “हायकोर्ट आपल्या दारी… (*Justice at Our Doorstep)

The Rotary Club of Sangli successfully conducted its 9th weekly meeting, titled “हायकोर्ट आपल्या दारी… (*Justice at Our Doorstep)”. The program was held in an interactive, question-answer format and drew keen participation from members.

The keynote speaker was Rtn. Adv. Pranand Joshi, with Rtn. Dr. Bhaskar Tamhankar moderating the session. The discussion focused on creating awareness about the concepts of High Court, Bench, and Circuit Bench, in the context of the newly inaugurated Kolhapur Circuit Bench of the Bombay High Court.

Adv. Joshi explained the functioning of High Courts as apex judicial bodies, tracing their evolution from the pre-independence era to the present. He highlighted the distinction between a permanent Bench and a temporary Circuit Bench, noting that the Kolhapur Circuit Bench was established to save citizens of Western Maharashtra the travel, time, and expense of seeking justice in Mumbai.

The talk also explored the possibility of Kolhapur’s Circuit Bench evolving into a permanent Bench, depending on case volume, infrastructure, and judicial availability. Adv. Joshi emphasized its wider economic benefits — saving litigants and lawyers an estimated ₹100–150 crores annually, while boosting local businesses and providing lawyers with 20–30% more opportunities to practice locally. Members appreciated his ability to present complex legal concepts in a simple, engaging, and inspiring manner. The program concluded with fellowship over high tea, graciously sponsored by Rtn. Adv. Pranand Joshi. The meeting witnessed enthusiastic participation from 62 members.

With this initiative, the Rotary Club of Sangli once again reaffirmed its commitment to community-oriented programs that promote awareness and dialogue on issues of social and civic significance.

Rotary
Club of Sangli

# Sunshine

**August 2025**









## Community Project 4Date: 11 August 2025and 23 August 2025

पर्यावरणपूरक गणपती मूर्ती बनावण्याची कार्यशाळारोटरी क्लब ऑफ सांगली आणि संस्कार भारती, सांगली यांच्या संयुक्त विद्यमाने , सोमवार दि. ११ ऑगस्ट २०२५ रोजी  क. भा. दामाणी हायस्कूल, सांगली येथील 8वी आणि 9वी च्या 15 विद्यार्थ्यांसाठी गणपती बनवणे कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

सदर कार्यशाळा सकाळी ११ ते सायंकाळी ६ पर्यन्त घेण्यात आली. संस्कार भारती, सांगलीच्या श्री. अरुण परचुरे आणि माधव वैशम्पायन यांनी पर्यावरणपूरक शाडूच्या मातीपासून सुबक गणेशमूर्ती बनवण्यासाठी प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले.

यावेळी संस्कार भारती, सांगलीचे अध्यक्ष श्री. मिलिंद महाबळ, खजिनदार श्री. विवेक गाडगीळ, श्री. सत्तीकर, शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. अमृता पटणे उपस्थित होते.रोटरी क्लब ऑफ सांगलीतर्फे सेक्रेटरी डॉ. अभिजित उदगावकर, रो. डॉ. रतन पाटील आणि रो. सुधा कुलकर्णी उपस्थित होते.

मुलामुलींनी उत्साहाने बनवलेल्या या सुबक गणेशमूर्ती वाळल्यानंतर त्या मूर्ती २३ ऑगस्ट २०२५ रोजी रंगवण्याची कार्यशाळा आयोजित करण्यात आली.मुलांना पर्यावरण रक्षणाची शपथ देण्यात आली.



## Community Project No. 5 Date: 14 August 25

पर्यावरणपूरक गणपती मूर्ती बनवण्याची कार्यशाळारोटरी क्लब ऑफ सांगली आणि निसर्ग संवाद ह्यांच्या संयुक्त विद्यमाने काल दिनांक १४.८.२०२५ रोजी पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा करण्या अंतर्गत शाडूच्या मातीपासून गणपती मुर्ती तयार करण्याची कार्यशाळा मालू हायस्कूल ,सांगली येथे घेण्यात आली.

निसर्ग संवाद चे श्री. राजेन्द्र जोशी सर, व त्यांचे सहकारी -वंदना मराठे, किर्ती जगदाळे, यशवंत कुलकर्णी, वाळवेकर ह्यांचे मोलाचे सहकार्य या कार्यशाळेला लाभले. रोटरी क्लब तर्फे रो. अभय भगाटे , रो. डॉक्टर रतन पाटील व रो. सुधाताई कुलकर्णी ह्यांचे सहकार्य पूर्णवेळलाभले.

मुला- मुलींनी छान प्रयत्न केला. एकूण १९मुर्ती तयार झाल्या. त्यातील १ मूर्ती हेड मॅडम खटके मॅडम ह्यांना भेट देण्यात आली.



## One Minute Rotary



**By PP Rtn. Dr. Chandrashekhar Purandare**

### मीटिंग क्र. ६ : ०७-०८-२०२५

रोटरीच्या डायरेक्टर बोर्डात बहुतेक नवीन सदस्याकडे सार्जंट ऍट आर्म्स हे पद असते आणि ते शोभेचे किंवा कमी महत्त्वाचे आहे असे आपण समजतो. प्रत्यक्षात ते किती महत्त्वाचे आहे ते आपण आज बघू या.

आपल्याकडे बाहेरील आणि आतील असे दोन सार्जंट असतात. बाहेरील सार्जंट चे काम आपल्या खाण्यापिण्याची किंवा फेलोशिपची व्यवस्था करण्याचे असते व हे सर्वांना ज्ञात आहे.

आतील सार्जंट चे काम फक्त अध्यक्षांना कॉलर घालण्याचे आहे असे आपण समजतो, पण ते खरे नाही! त्याचे मुख्य काम सभागृहाचा डेकोरम सांभाळणे व सभा व्यवस्थित पार पडण्यासाठीची सर्व योजना करणे हे आहे. येणाऱ्या पाहुण्यांची गरजेप्रमाणे जाण्या-येण्याची व्यवस्था, त्यांची ओळख करून देण्याची व्यवस्था, आभार प्रदर्शनाची व्यवस्था, सभेनंतर त्यांना आभाराचे पत्र पाठवणे ही सगळी कामे त्यात येतात. म्हणजे अध्यक्षांचे बरेचसे काम यामुळे कमी होऊ शकते. याशिवाय क्लब कडील सर्व वस्तूंची नोंद करणे (inventory) व ते रजिस्टर अद्ययावत ठेवणे हेही काम त्यांच्या अखत्यारीत येते.

### मीटिंग क्र. ७ : १४-०८-२०२५

आपल्याला हे माहीतच आहे की ऑगस्ट महिना हा रोटरी जगतात 'मेंबरशिप डेव्हलपमेंट मंथ' म्हणून साजरा केला जातो. नवीन सदस्य रोटरीत कसा जॉईन करून घेतला जातो याची सहा टप्प्यांची पद्धत आहे.

## One Minute Rotary

Identify, Introduce, Invite, Induct, Orient, and Involve.

समाजातील आपल्या संपर्कातील रोटरी तत्वे पाळणाऱ्या व्यक्तींचा आपण शोध घेतो. उत्तम रोटरी सदस्य होऊ शकतील अशा व्यक्तींची यादी डायरेक्टर बोर्डापुढे ठेवून मान्यता घेतली जाते. कृपया हे लक्षात ठेवा की अर्ज करून रोटरी जॉईन करता येत नाही! रोटरी सदस्याने निमंत्रित करावे लागते!!

त्यानंतर त्यांना आमंत्रित करून रोटरी विषयी सर्व माहिती दिली जाते. त्यामध्ये रोटरी मधील financial dues चीही कल्पना दिली जाते. काही सभांना हजर राहून ते स्वतः रोटरीची कार्यपद्धती पाहू शकतात. रोटरीत येऊ इच्छिणाऱ्या सदस्यांची पूर्ण माहिती सर्व क्लब सदस्यांना पाठवली जाते व काही objections असल्यास दहा दिवसांच्या आत मागवली जातात.

त्यानंतर मेम्बरशिपचे फॉर्म्स व चेक्स घेतले जातात. सर्व formalities पूर्ण झाल्यावर समारंभपूर्वक या सदस्यांना रोटरीत प्रवेश दिला जातो.

## मीटिंग क्र.८ : २१-०८-२०२५

मित्रहो, क्लबमध्ये आल्यावर आपण प्रथम काय करतो? Attendance रजिस्टर वर सही! त्यात आपल्याला शेवटी Attendance exempt म्हणून वेगळी लिस्ट दिसेल.

ही वेगळी का आहे?पूर्वी क्लब मीटिंग च्या उपस्थिती चे नियम फार कडक होते, त्यावेळी ज्येष्ठ सदस्यांसाठी या नियमात सूट दिली जाई, व आजही दिली जाते.

## One Minute Rotary

काळानुरूप आज attendance चे नियम कडकपणे लागू केले जात नाहीत ही गोष्ट वेगळी!यासाठी सदस्याचे वय व त्याची रोटरीतील वर्षे यांची बेरीज 85 च्या वर असावी लागते. यासाठीची न्यूनतम 65 वर्षे वयाची अटही आहे.

या सदस्यांना financial dues मध्ये मात्र कुठलीही सवलत दिली जात नाही.

## मीटिंग क्र.९ : २८-०८-२०२५

आपण मागच्या फलकावर नजर टाकलीत तर तुम्हाला Assistant Governor म्हणून एक नाव दिसेल, हे नेमके करतात तरी काय?

AG ची नियुक्ती गव्हर्नर कडून केली जाते, व त्यासाठी माजी क्लब अध्यक्ष असणे ही आवश्यक पात्रता समजली जाते. हे आपल्याच क्लबचे सदस्य असणे आवश्यक नाही, किंबहुना सध्या दुसऱ्या क्लबचाच सदस्य AG म्हणून नियुक्त केला जातो. AG हा क्लब व DG ऑफिस यामधील दुवा म्हणून काम करतो.

क्लबचे काम व्यवस्थित चालते की नाही हे बघणे, आर्थिक बाबींची योग्य पूर्तता करून घेणे, क्लबला त्यांच्या कुठल्याही अडचणीत योग्य सल्ला देणे, DG व्हिजिट योग्य रीतीने पार पाडण्यास मदत करणे अशी व इतर सर्व आवश्यक मदत ते क्लबला करतात.

DG कडून येणारे सर्व संदेश क्लबपर्यंत पोचवणे, सर्व District events मध्ये भाग घेणे, अधिकतम TRF collection साठी क्लबना उद्युक्त करणे, कॉन्फरन्ससाठी अधिकाधिक सदस्यांना घेऊन जाणे अशी अनेक कामे AG सांभाळतात.

एक महत्वाचे की club business meeting ला मात्र आपल्या क्लब चे सदस्य नसल्यास AG च काय DG व रोटरी इंटरनॅशनल अध्यक्षही उपस्थित राहू शकत नाहीत, इतका क्लब सार्वभौम आहे.

## Our day out in Pune Metro



by

Rtn. Dr. Chandrashekhar Purandare

# Our day out in Pune Metro

बरेच दिवस पुण्याच्या मेट्रोतून फिरायची आम्हां उभयतांची (मी व डॉ. वीणा) खूप इच्छा होती, पण मुहूर्त सापडत नव्हता. कालच्या रविवारी मात्र गोष्टी जमून आल्या. सिंबायोसिस मेडिकल कॉलेजपासून मेट्रो स्टेशन्स खूप लांब, शिवाय पार्किंगची सोय हवी . शेवटी पुणे विद्यार्थी गृहातील माझे मित्र अरविंद सोनटके व नारायण देशमुख यांच्याकडून मेट्रोबद्दल मूलभूत माहिती घेऊन पीसीएमसी स्टेशनपासून प्रवास नक्की केला. दुपारी 12 वाजता पीसीएमसी जवळ कार पार्क करून स्टेशनमध्ये प्रवेश केला व त्यानंतर सुमारे पाच तास आम्ही मेट्रोमय होऊन गेलो.

पुणे मेट्रोच्या पर्पल, ब्लू आणि रेड अशा तीन लाईन्स आहेत. त्यापैकी पर्पल लाईन ही पीसीएमसी पासून स्वारगेट पर्यंत व ब्लू लाईन वनाज पासून रामवाडी पर्यंत जाते. निर्माणाधीन तिसरी रेड लाईन शिवाजीनगरहून हिंजवडी ला जाईल. प्रस्तावित 66 किलोमीटर पैकी 33 किलोमीटर सध्या प्रवाशांसाठी उपलब्ध आहे. पर्पल लाईन (पीसीएमसी ते स्वारगेट) व ब्लू लाइन (वनाज ते रामवाडी) वरही दोन्ही बाजूंना स्टेशनचा विस्तार अपेक्षित आहे. मेट्रोचा उपयोगही वेगाने वाढत आहे. 2023 साली 93 लाख लोकांनी, तर 2024 साली साडेचार कोटी लोकांनी मेट्रोचा वापर केला आहे.

स्टेशन्स खूप स्वच्छ व वातानुकुलित आहेत. मराठी, हिंदी व इंग्रजीतून सर्वत्र सूचना लिहिलेल्या आहेत. तिकीट कॅश किंवा नेट पेमेंट करून घेता येते, पण प्लॅटफॉर्मवर जाण्यापूर्वी ते स्कॅन करणे आवश्यक असते. मेट्रोची फ्रिक्वेन्सी साधारण पाच ते सात मिनिटांनी असते.

## Our day out in Pune Metro

दारे बंद झाल्यानंतर तिन्ही भाषांमधून येणारे स्टेशन कोणते, कुठल्या बाजूचे दार उघडणार व उतरताना काय काळजी घ्यायची या सर्व सूचना येत राहतात. पीसीएमसी ते शिवाजीनगर हा प्रवास ओव्हरहेड आहे तर शिवाजीनगर ते स्वारगेट हा प्रवास अंडरग्राऊंड आहे. या प्रवासाला साधारण 35 मिनिटे लागली. प्लॅटफॉर्म सोडताना तिकीट पुन्हा स्कॅन करावे लागते.

स्टेशन परिसरात मोबाईल ॲक्सेसरीज, खाद्य पदार्थ, पुस्तके व कपड्यांची छोटी छोटी दुकानेही उपलब्ध आहेत आणि त्यांचे दरही रिझनेबल आहेत. आम्ही आमच्या मोबाईलची स्क्रीन गार्ड व कव्हर्स आत मध्ये बदलूनही घेतली. स्टेशनवर चांगली वॉशरूम्स आहेत, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आहे, तसेच मदत करणारा तत्पर स्टाफ आहे. एकंदरीतच प्रवाशांना फाइव स्टार अनुभव येईल असे वातावरण आहे. बाहेर पडण्यासाठी एस्केलेटर व लिफ्ट दोन्हीही उपलब्ध आहेत. पूर्वीचे स्वारगेटचे जे पीएमटी बस स्थानक होते, तिथेच मेट्रोचे हे भव्य टर्मिनस उभे आहे.

स्वारगेटहून आम्ही वनाझ चे तिकीट काढले. वनाजला जाण्यासाठी जिल्हा न्यायालय या स्टेशनला उतरून दोन मजले वर चढून ब्लू लाईन ला जावे लागते. वनाज मेट्रोचा मार्ग डेक्कन पर्यंत मुठा नदीकडेने व नंतर कर्वे रोड व पौड रोड ने जातो व या भागाचे उंचावरून छान निरीक्षण करता येते. वनाज स्टेशन हे वनाझ फॅक्टरीला लागूनच आहे.

वनाझहून रामवाडीचे तिकीट काढून आम्ही पुणे रेल्वे स्टेशन, रुबी हॉल, बंडगार्डन या परिचित मार्गाने रामवाडी ला पोहोचलो. म्हणजे स्वारगेट, पुणे स्टेशन व शिवाजीनगर अशा तीनही मोठ्या बस स्थानकांना मेट्रो कनेक्टिव्हिटी उपलब्ध करून दिलेली आहे. रामवाडी स्टेशन हे नगर रोडवरील नोवोटेल व हयात या हॉटेल समोरच आहे. या मार्गावर मुठा नदी आपल्याला सतत दिसत राहते.

## Our day out in Pune Metro

रामवाडीहून पीसीएमसी चे तिकीट काढले ते क्यू आर कोड स्कॅन करून! एकंदरीतच कॅशपेक्षा नेट पेमेंटला सरकारची व लोकांचीही पसंती जास्त आहे असे दिसले. रविवार असल्यामुळे तिकिटाला बरेच डिस्काउंटही होते. परत जिल्हा न्यायालय मार्गे आम्ही पीसीएमसी स्टेशन बाहेर आलो ते सायंकाळी पाच वाजता! म्हणजे जवळपास पाच तास आम्ही मेट्रो परिसराचा मनमुराद आनंद घेतला.

सीनियर सिटिझन असल्यामुळे आपल्याला प्रवासात काही अडचणी येतील अशी शंका होती, पण कुठलीही आडकाठी न येता निर्विघ्नपणे आमचा प्रवास पार पडला.

## Key Aspects of the August Theme

Membership and New Club Development Month.

•**Member Recruitment and Retention**:

•The month is dedicated to attracting new members and ensuring existing members are engaged and committed to the club and its service goals.

•**New Club Creation**:

•There is an emphasis on establishing new Rotary clubs to expand the organization's reach and impact.

•**Club Innovation**:

•Rotary encourages clubs to develop new, flexible models and nontraditional club structures to offer more ways for people to connect and serve.

•**Welcoming Diversity**:

•The theme involves strengthening the diversity within clubs and adapting them to the needs of rising generations.

•**Connecting to the "Unite for Good" Theme**:

•August's focus on membership directly supports the overall 2025-26 Rotary year theme of "Unite for Good" by strengthening the human connection that drives positive change.

## जागरूक पालक



सौ . सुनिता बजाज, सांगली.
माजी अध्यक्ष
Inner Wheel Club of Sangli,

शिकण्याची गरज फक्त तिलाच आहे ,असे वाटते का तुम्हाला? ती जेव्हा शिकलेली नव्हती व आज ती शिकलेली आहे तरी तिलाच, मान वर करू नकोस, जोरात बोलू नकोस, खिदळू नकोस, हसू नकोस, कपडे नीटनेटके घाल, पण ...असे काय कपडे होते त्या गरोदर बिल्कीस बानू चे? काय कपडे होते ड्युटीवर काम करणाऱ्या अभयाचे? काय कपडे होते त्या तीन साडेतीन वर्षाच्या चिमूरडीचे? आणि हो.. काय कपडे होते त्या साठ वर्षाच्या आजीचे?

मान्य आहे स्त्री ही कोहिनूर हिऱ्यासारखी खास आहे .आणि म्हणूनच तिला खूप जपून रहावे लागते .जसे आपण हिऱ्याला खास सांभाळून ठेवतो तसे. त्यासाठी तिला स्वतःची खास ओळख समाजामध्ये करावी लागते. प्रत्येक वेळा काहीही झाले तर फक्त तिलाच आपण जबाबदार धरू शकत नाही. किंवा तिच्या वागणुकीवर, कपड्यावर प्रत्येक वेळी मुद्दा बनवू शकत नाही.

प्रत्येक स्त्री किंवा पुरुष यांची ओळख त्यांच्या वागणुकीवरून, हालचालीवरून, व्यवहारावरून आपणास होत असते. म्हणून शिकवण्याची गरज तिला_ त्याला, त्याहीपेक्षा पालकांना आहे. असे आपल्याला नाही वाटत? वाटते ना .. मग आधी पालकांनी सुसंस्कृत व्हावे, सभ्यता, चांगले संस्कार आत्मसात करावे, नंतर ते आपल्या पाल्यांमध्ये रोपावेत म्हणजे पालक आणि पाल्य यांच्यात एक सशक्त विश्वासाचे नाते निर्माण होईल. कारण आपली भारतीय संस्कृती ही खूप उदारवादी अशी पुरातन संस्कृती आहे. पण काळापरत्वे आपण आपल्या संस्कृती पासून दूर लोटले जात आहोत.

## जागरूक पालक

पाश्चिमात्य संस्कृतीचे आकर्षण व मग त्यात वाहत जाणे, तिचा स्वीकार करणे आणि मग आपल्या संस्कृती पासून दूर होणे हे ओघातच आले. खरंच शिकवा तिला तसेच त्यालाही संस्कार घाला. त्याची नजर सुधारण्याची गरज आहे, दृष्टिकोन बदलण्याची गरज आहे, शिकवा तुमच्या मुलाला, तुमच्या भावाला, भाच्याला, काकाला, मामाला, मित्र, नवरा, सासऱ्याला आणि अगदी बापाला सुद्धा. नातं कोणतेही असो, ते विसरत नाही आपल्यातल्या आतल्या पुरुषाला. घाणेरड्या नजरेने तर नेहमीच पाहिले. संधी मिळेल तेव्हा ओरबडूनही काढलं. ठेचा अशा प्रवृत्तींना, नरधामांना.

आठवा शिवरायांना. त्यांनी कधीही आपल्या दरबारात नर्तकी नाचवली नाही. असे कधी ही वाचण्यात आले नाही किंवा ऐकण्यातही आले नाही.अहो शिवाजी महाराजांनी स्त्रीचा सन्मान नेहमी एक आई म्हणूनच केला. खूप आदराने ते स्त्रियांकडे बघत .आज स्त्रीचा जेव्हा जेव्हा अपमान होतो, चारित्र्याचे जेव्हा जेव्हा दहन होते, तेव्हा आम्ही फक्त मेणबत्त्या जाळतो. नेते मंडळी नुसती आश्वासने देतात. मग काय हे सगळे असेच होत राहणार काय? त्यात कोठेही काही मज्जाव, अटकाव, असे काहीच नाही? मी तर म्हणेल, आधी आपली मानसिकता बदला.

जो घरातल्या बाईला म्हणजे, आई, बहीण, बायको, मुलगी, वहिनीला, अगदी मैत्रिणीला सुद्धा सन्मानाने वागणूक देतो, तो खरा अर्थाने पुरुष. येथे त्याचे पुरुषत्व दिसून येते. आम्ही कितीही शिकलो_ सवरलो, सुसंस्कृत झालो, सभ्य असण्याचा दावा केला, स्वतःला सिद्ध केले, तरी मग आज निर्भया अभया अशी कांड का निर्माण होत आहे? खरंच एक विचारणीय विषय आहे?. म्हणून मी म्हणेल, शिकवा त्याला_ तिला करण्यापेक्षा दोघांनाही शिकवा व त्याआधी आम्ही पालकांनी शिका, सुसंस्कृत व्हा, कारण आजची पिढी कुठेतरी भरकटत चालली आहे. त्याला काही अंशी पालकही जबाबदार आहेत.

## जागरूक पालक

आपण कुठेतरी कमी पडत आहोत त्यांना संस्कार घालायला, सुसंस्कृत करायला, सभ्य बनवायला, आपापल्या मर्यादा शिकवायला, अशी कितीतरी उदाहरणे देता येतील,... आजच्या पिढीमध्ये जशी सहनशक्तीची कमतरता, समोरच्यांचे ऐकून न घेणे, शेअरिंग हे आम्हाला तर माहीतच नाही, हार जीत आम्हाला पचवता येत नाही, स्थिरत्व कमी, यामुळे एक न अनेक आज समाजात घटना घडत आहे.

अगदी छोट्या छोट्या कारणांसाठी आत्महत्या करणे, खून मारामारी, दरोडेखोरी, लाच लुचवत ,फसवेगिरी.. इत्यादी... इत्यादी... पणआत्ता वेळ आली आहे आपणास चंडिका बनण्याची. त्या नरधामाला, महिषासुराला, शूरपणकेला मारण्याची, ठेचण्याची, चांगला धडा शिकवण्याची. पण मी म्हणेल त्यांचा जन्मच नको व्हायला. त्या आधीच आपण सावध व्हायला पाहिजे. म्हणून आधी आम्हा पालकांना शिकण्याची, सतर्क राहण्याची, अपडेट राहण्याची, गरज आहे.

आपापल्या पाल्यांसोबत विश्वासाचं नातं निर्माण करा. कारण हल्ली सगळी मुलं मुली खूप हुशार, स्मार्ट असतात. फक्त त्यांच्यात कमी असेल तर संस्काराची. तीच तर खरी गरज आहे. कितीही शिकले, सवरले, जगाच्या पाठीवरती कुठेही गेले तरी, माणुसकी विसरावी नाही. हे त्यांना ठासून समजवायला पाहिजे. आपण पालकच जर धड नसू, तर त्यांना कसे सुसंस्कृत करू?

शिवबा तयार करायचा असेल. तर, आधी जिजाऊ बनावे लागेल, कंबर कसून लागा तयारीला. राम, शिवाजी महाराज, झाशीची राणी, अहिल्याबाई हवी आहे ना. मग आधी राम बना, सीता आपोआप मिळेल. सीता बना, राम आपोआप मिळेल. आणि शिवराज्य पाहिजे आहे तर, जिजाऊ बना. पालकांनो, लागा तयारीला, दृढ निश्चयाने एक संकल्प घेऊन. सशक्त भारताची निर्मिती ही फक्त पालकांच्या हाती आहे. विचार करा.